जा.क्र./OW.No ९५०८/पोउआ/प्रकटीकरण /2020
पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),गुन्हे शाखा, मुंबई यांचे कार्यालय.
Office of the
DY.Commissioner of Police (Detection),
Crime Branch, Mumbai.
दूरध्वनी क्र. /Tel. No. 2262 1220
दिनांक/Date : १७ /12/2020

प्रति,

प्रभारी पोलीस निरीक्षक,
पोलीस परिपत्रक कार्यालय,
मुंबई

विषय :- Best Detection of the Month October -- 2020 'उत्कृष्ट गुन्हे शोध' व Best Conviction of the Month October – 2020 उत्कृष्ट अपराधसिद्धी पोलीस नोटीस व वेबसेल मध्ये प्रसिध्द करणेबाबत...

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे वतीने मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी, अंमलदारांना बेस्ट डिटेक्शन/बेस्ट कनव्हिक्शन/बेस्ट रिकव्हरी ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध, उत्कृष्ट अपराधसिध्दी व उत्कृष्ट मालमत्ता हस्तगत याकरीता प्रत्येक महिन्याला निवड करण्यात येते.

माहे ऑक्टोंबर २०२० करीता बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध व बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट अपराधसिध्दी याकरीताचे खालील पोलीस ठाणे यांना देण्यात आलेले आहे. तरी सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

**अ) माहे ऑक्टोंबर — २०२० करीताचे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ —**

१) मुलुंड पोलीस ठाणे गु.र.क्र. ६४५/२०२०, कलम ३०२,१२०(ब) भादविसं

**ब) माहे ऑक्टोंबर — २०२० करीताचे बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ —**

१) माहिम पोलीस ठाणे गु.र.क्र. २२१/२०१३, कलम ३०७, ३४, ३०२ ,१०९, २१२ भादवि सह ४, २५ भा.ह.का.

सदर उत्कृष्ट गुन्हे शोध ( बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ) व उत्कृष्ट अपराधसिध्दी (बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ ) बाबतची माहिती सोबत जोडण्यात आली असून सदरची माहिती पोलीस नोटीस व मुंबई पोलीसांचे वेबसेल वर प्रसिध्द करण्यात यावी.

पोलीस उप—आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई.

प्रत:—,
वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वेबसेल, पोलीस आयुक्त कार्यालयाचे आवार, मुंबई.

**मजकुर :-**

दिनांक ०९/१२/२०२० रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **" Best Detection of the Month "** **माहे ऑक्टोंबर २०२०** या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ऑक्टोंबर — २०२०

| ०१ | मुलूंड पोलीस ठाणे, परिमंडळ—०७ | गु.र.क्र. ६४५/२०२०, कलम ३०२, १२०(ब) भादविसं |
|---|---|---|

**—: ' खुन ':—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—** दिनांक ०३/१०/२०२० रोजी फिर्यादी श्री. नंदेश मारूती गवळी, वय ३५ वर्षे यांनी समक्ष येवुन तक्रार दिली की, त्यांचे वडील श्री. मारूती लक्ष्मण गवळी वय ७० वर्षे हे मागिल सहा महिन्यापासुन मुलुंड (प) येथील शॉप नं १७, हंसा व्हिला, वालजी लदद्या रोड, सिल्वर ग्लास दुकान येथे झोपण्यास जात होते. दिनांक ०२/१०/२०२० रोजी २०:३० वा. ते झोपण्यासाठी सिल्वर ग्लास दुकानासमोर गेले होते. सकाळी उशिरा पर्यंत ते निवासस्थांनी परत न आल्याने सदर ठिकाणी जावून पहाणी केली असता कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे पोटात भोसकुन, तसेच सिमेंन्ट ब्लॉक ने डोक्यावर मारून त्यांस गंभीर जखमी करून त्यांचा निर्घृणपणे खुन केला असल्याचे दिसले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंद करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. नंदेश मारूती गवळी, वय ३५ वर्षे |
| बळीत इसम | :— | श्री. मारूती लक्ष्मण गवळी वय ७० वर्षे |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) दिपक कन्हैया मोरे, वय ३८ वर्षे<br>२) विनोद कन्हैया मोरे, वय ३० वर्षे<br>३) मोहम्मद आसीफ नासीर शेख, वय २८ वर्षे<br>४) मो. मोईन्नुद्दीन अल्लाउद्दीन अन्सारी उर्फ साहील, वय २७ वर्षे<br>५) मोहमद आरीफ अब्दुल सत्तार शेख, वय ३० वर्षे<br>६) शहानवाज उर्फ सोनू अख्तर शेख, वय ३० वर्षे<br>दिनांक १२/१०/२०२० रोजी |

**तपास कौशल्य :—** नमुद गुन्हयात घटनास्थळ हे रात्री लोकांची फारशी वर्दळ नसलेले व आडबाजुला असल्यामुळे घटना प्रत्यक्ष पाहणारे कोणतेही साक्षिदार अथवा इतर उपयुक्त माहिती मिळेल असे सि.सि.टी.व्ही कॅमेरे मिळाले नाही. घटनास्थळी मिळालेल्या वस्तु वरून दारू पिणारे अथवा अंमली पदार्थ सेवन करणारे लोकांवर संशय आल्याने परीसरातील अभिलेखावरील आरोपी व सदर ठिकाणी दारू सेवन करणारे व्यक्ती यांचेकडे कसुन तपास करण्यात आला.

सदर गुन्हयाचा कसोशीने तपास करून देखील मयत इसमाच्या खुनामागे असलेला हेतू स्पष्ट होत नव्हता. सदर गुन्हयाचा तपासामध्ये मयत इसमाचे नातेवाईक यांच्याकडे देखील संशयील नजरेने सखोल तपास करण्यात आला. त्यांचे वडील बाहेर का झोपत होते?. तसेच ते कोरोना काळात लोकांनकडून मागून का खात होते, याबाबत देखील तपास करण्यात आला होता परंतू काहीही उपयुक्त माहिती मिळून आली नाही. मयताच्या समाजाबाबत चौकशी करण्यात आली त्यांचा गवळी समाज हा आज देखील पारंपारीक पद्धतीने भांडणे सोडवित असल्याचे व त्याच्या रूढी आजही जपल्या जात असल्याची माहिती मिळून आली. त्यामध्ये मयत हा महिन्यातून चार दिवस जोगवा मागण्याचे काम करीत असल्याचे देखील समजले.

मयताचे मिळकत तसेच प्रॉपर्टीबाबत वाद आहे काय? हे देखील तपासण्यात आले. मयताचे घराची झडती घेण्यात आली असता त्यांच्याकडे एक देवाऱ्याची पेटी मिळून आली. ती पेटी तपासली असता त्यामध्ये जोगवा मागण्यासाठी चांदीचे देव तसेच कागदासारख्या बारीक लाकडाच्या

मुलूंड पोलीस ठाणेच्या तपास पथकाने अथक प्रयत्न करून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे तसेच मानवी कौशल्याचा अचुक वापर करून गुन्हयात कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तसेच सिसिटीव्ही फुटेज उपलब्ध नसताना गुन्हयातील मुख्य सुत्रधार असलेले दोन सख्खे भाऊ व प्रत्यक्ष गुन्हा करणारे तीन आरोपींसह एकूण ६ आरोपींना सतत १२ दिवस केलेल्या कौशल्यपुर्ण तपासामुळे ताब्यात घेवून सदर गुन्हयात अटक केली व गुन्हा उघडकीस आणला आहे.

**मुलुंड पोलीस ठाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ. क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | प्र.वरिष्ठ पोलीस निरीक्षक | रमेश ढसाळ | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक | प्रकाश वारके | प्रशस्तीपत्रक |
| ३ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | सचिन कदम | प्रशस्तीपत्रक |
| ४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | संतोष कांबळे | प्रशस्तीपत्रक |
| ५ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | सचिन पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ६ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | विजय सांडभोर | प्रशस्तीपत्रक |
| ७ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | समाधान चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| ८ | पोलीस उप निरीक्षक | फयाज मुलानी | प्रशस्तीपत्रक |
| ९ | पोलीस उप निरीक्षक | पंडीत सोनावणे | प्रशस्तीपत्रक |
| १० | पोलीस उप निरीक्षक | विकास राऊत | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पोलीस उप निरीक्षक | दिनेश बागुल | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पोलीस उप निरीक्षक | तुकाराम भोपळे | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पोलीस उप निरीक्षक | अमित यादव | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पोलीस नाईक | पो.ना.क्र ००७७९/ सुहास चवरे, | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पोलीस नाईक | पो.ना.क्र.९९०७०५/ मोहन शिंदे, | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पोलीस नाईक | पो.ना.क्र.०३१००७/ अर्जुन कोकाटे | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पोलीस शिपाई | पो.शि क्र ३४१०३/धनराज अव्हाड | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पोलीस शिपाई | पो.शिक्र ३४४३२/राजकुमार वाघमारे | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पोलीस शिपाई | पो.शि.क्र.०४०१४०/रमेश वनकळस | प्रशस्तीपत्रक |
| २० | पोलीस शिपाई | पो.शि.क्र.५००७१/ नितीन पाटील | प्रशस्तीपत्रक |
| २१ | पोलीस शिपाई | पो.शि.क्र.०६०४९२/ अजय जाधव | प्रशस्तीपत्रक |
| २२ | पोलीस शिपाई | पो.शि.क्र.७०३५१/ मनोज पाटील | प्रशस्तीपत्रक |
| २३ | पोलीस शिपाई | पो.शि.क्र.७०३६६ /प्रकाश शिवदे, | प्रशस्तीपत्रक |
| २४ | पोलीस शिपाई | पो.शि.क्र.९२३६० /बस्तीराम बोडके | प्रशस्तीपत्रक |
| २५ | पोलीस शिपाई | पो.शि.क्र.८००८३३ /विष्णु राठोड | प्रशस्तीपत्रक |
| २६ | पोलीस शिपाई | पो.शि.क्र ९०७२६/यशवंत घाडगे | प्रशस्तीपत्रक |
| २७ | पोलीस शिपाई | पो.शि.क्र ०९२५६/ज्ञानेश्वर हणबर | प्रशस्तीपत्रक |
| २८ | पोलीस शिपाई | पो.शि.क्र.०९३१०४/भारत पाटील | प्रशस्तीपत्रक |
| २९ | पोलीस शिपाई | पो.शि.क्र११५६७ /अनिल पवार | प्रशस्तीपत्रक |
| ३० | पोलीस शिपाई | पो.शि.क्र११५३७ /संदिप वाघमोडे | प्रशस्तीपत्रक |
| ३१ | पोलीस शिपाई | पो.शि.क्र १११४९९ /सुरेंद्र भोकरे | प्रशस्तीपत्रक |
| ३२ | पोलीस शिपाई | पो.शि.क्र. ०६०६९६/विनोद जगदाळे | प्रशस्तीपत्रक |

मजकुर :—

दिनांक ०९/१२/२०२० रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने " **BEST CONVICTION OF THE MONTH** " **माहे ऑक्टोंबर —२०२०** या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ ऑक्टोंबर — २०२०

| | | |
|---|---|---|
| **०१** | **माहीम पालीस ठाणे बंदर परिमंडळ—०५** | **गु.र.क्र. २२१/२०१३, कलम— ३०७, ३४, ३०२, १०९, २१२ भादवि सह ४, २५ भा.ह.का.** |

**—: " खुन " :—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयातील फिर्यादी श्री अरविंद आशोक लोकरे, वय २३ वर्षे, हे रहात असलेल्या घरासमोर झाड ठेवण्याची कुंडी ठेवण्यात आली होती. ती कुंडी काढून टाकण्याकरीता एका महिन्यापुर्वी इसम नामे राकेश पाटील उर्फ येडा, तसेच परम भालेराव, यांनी फिर्यादीच्या आईस शिवीगाळ केली होती व कुंडी तोडून टाकली होती. त्यावेळी त्यांनी पोलीसांत तक्रार केली होती. त्यांनतरही नमुद इसमांनी फिर्यादी यांना त्रास दिला होता.

दिनांक ०५/०५/१३ रोजी सुमारे १०.३० वाजण्याचे दरम्यान फिर्यादी त्यांचे मित्रांसह सार्वजनिक शौचालय, विवेकानंद गार्डनच्या बाजुला, माहीम येथे काही अंतरावर उभे होते. त्यावेळी फिर्यादीचा भाऊ प्रविण लोकरे, वय २५ वर्षे, हा शौचालयाच्या आंत गेला होता. त्याच दरम्यान १) राकेश नंदकुमार पाटील उर्फ येडा, ४० वर्षे, २) करण नंदकुमार पाटील, वय ३५ वर्षे, ३) महेंद्र केशरीनाथ मिस्त्री, वय ४६ वर्षे, ४) दिलीप श्रीपद भालेराव, वय ४५ वर्षे, हे हातात तलवार, चॉपर, चाकू घेवुन शौचालयाच्या दिशने आले. व त्यांनी पुर्व वैमनस्यातुन फिर्यदी यांचा भावास तलवार, चॉपर व चाकु आशा धारदार व प्राणघातक हत्याराने शरिरावर वार करून गंभीर दुखापत करून जिवे ठार मारले. सदरबाबत फिर्यादीं यांनी दिलेल्या फिर्यादीवरून त्यांचा सविस्तर जबाब नोंद करून गुन्हा नोंद करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी . | :— | श्री अरविंद आशोक लोकरे, वय २३ वर्षे, |
| बळीत/मयत | :— | प्रविण आशोक लोकरे, वय २५ वर्षे |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) राकेश नंदकुमार पाटील उर्फ येडा ४० वर्षे,<br>२) करण नंदकुमार पाटील, वय ३५ वर्षे,<br>३) महेंद्र केशरीनाथ मिस्त्री, वय ४६ वर्षे,<br>४) दिलीप श्रीपद भालेराव, वय ४५ वर्षे.<br>दिनांक ०७/०५/२०१३ |
| निकाल दिनांक | :— | **२१/१०/२०२० रोजी** |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | नमुद गुन्हयात मा. न्यायालयाने चारही आरोपीतांना जन्मठेप व प्रत्येकी ५०००/— रूपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. |

**तपास कौशल्य** :— सदर गुन्हयाचे तपासादरम्यान प्रत्यक्षदर्शी ०२ साक्षीदारांचे सीआरपीसी कलम १६४ अन्वये जबाब नोंदविण्यात आले. घटनास्थळांचा सविस्तर पंचनामा करण्यात येवून मयत व जखमी इसमांचे घटनेच्या वेळचे अंगावरील कपडे व तलवार, गुप्ती, कुकरी हे ताब्यात घेवून सी. ए.कडे तपासणी अहवालाकरिता पाठवुन अहवाल प्राप्त करण्यात आला. तसेच मयत इसमाचे मृतदेहाचा मरणोत्तर पंचनामा करून शवविच्छेदन अहवाल प्राप्त करण्यात आला.

गुन्हयाच्या वेळी वापरण्यात आलेल्या वाहनांचा शोध घेवुन ताब्यात घेण्यात आले. तपासामध्ये एकूण ४० साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले. मा. सत्र न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. आरोपीने मा. सत्र न्यायालयात ०२ वेळा जामीन मिळणेकरिता अर्ज सादर केला होता परंतु भक्कमपणे अहवाल सादर करण्यात आल्याने त्याचा जामीन अर्ज नामंजूर करण्यात आला.

मा. सत्र न्यायालयात खटला चालु असताना सदर खटल्यातील पंच/प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांना माहिम पोलीस ठाणे येथे बोलावुन घेवून पुन्हां घटनेचे वाचन करून योग्य मार्गदर्शन करून पंच/साक्षीदारांना वेळोवेळी प्रत्येक तारखेस मा. सत्र न्यायालयात हजर ठेवून वेळोवेळी घटनेची आठवण करून देण्यात आली व त्यानूसार मा.न्यायालयात भक्कमपणे साक्षीदारांनी साक्ष दिली. तपासी पथकातील तत्कालीन पोलीस उप निरीक्षक श्री रविंद्र भानुदास कळमकर ( पथम तपास अधिकारी), पोलीस निरीक्षक किशोर सावंत (मुख्य तपास अधिकारी), पो.शि.क्र. ०९०६७२/ बद्रिनाथ रामचंद्र पालवे, (मुख्य तपास अधिकारी यांना दोषारोपपत्र दाखल करेपर्यंत पुर्ण तपासात मदत व न्यायालयीन खटला प्रक्रियेमध्ये मदत), पो.शि.क्र. ०१–००३३३/रामदास नथू भोई व पो.शि.क्र. ११०७६३/ प्रकाश दादाराव सावंत (न्यायालयीन कामकाज), यांनी मा. सत्र न्यायालयाच्या कामकाजाच्या वेळी सक्रियपणे सहभाग घेवून आरोपीतांना त्यांनी केलेल्या गुहयांमध्ये जन्मठपेची शिक्षा होण्याकरिता अथक परिश्रम घेतले.

**माहिम पोलीस ठाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा–याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १. | पोलीस निरीक्षक | श्री. किशोर लक्ष्मण सावंत | प्रशस्तीपत्रक |
| २. | तत्कालीन पोलीस उप निरीक्षक | श्री. रविंद्र भानुदास कळमकर | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पोशिक्र. ०९०६७२ | श्री. बद्रिनाथ रामचंद्र पालवे | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पोशिक्र. ०९०३३३ | श्री. रामदास नथ्थु भोई | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पोशिक्र. ११०७६३ | श्री. प्रकाश दादाराम सावंत | प्रशस्तीपत्रक |